Historicity Research Journal
Volume 2 | Issue 5 | Jan 2016

Impact Factor : 0.4521(UIF)
ISSN:- 2393-8900

Research Article

कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान

पवार सज्जन उध्दव

महात्मा फुले महाविद्यालय, पिंपरी.

सारांश :

शिक्षण हे समाज परिवर्तनाचे प्रभावी माध्यम आहे. समाज जीवनाच्या गरजा, आशा–आकांक्षा व उद्दिष्टे यांच्याशी शिक्षणाचा निकटचा संबंध आहे. समाजाच्या सांस्कृतिक आणि सामाजिक विचार प्रवाहांना सुयोग्य वळण देण्याचे काम शिक्षणाचे आहे. मनुष्याची अस्मिता आणि अस्तित्व शाबुत ठेवून त्याला स्वावलंबनाने, स्वाभिमानाने आणि सुखाने जगण्याचा मार्ग दाखविणे हे शिक्षणाचे सर्वांत महत्वाचे कार्य आहे. त्यामुळे समाजाची सर्वांगीण प्रगतीसाठी समजातील सर्वांना शिक्षण मिळाले पाहिजे. परंतु भारतीय समाजात शिक्षण घेण्याचा अधिकार मुठभर लोकांनाच होता. त्यामुळे बहुसंख्य बहुजन समाज शिक्षणापासून वंचित होता.

प्रस्तावना:

मुठभर लोक शिक्षण घेऊन सुखाची फळे चाखतात. तेव्हा समाजातील ढीगभर लोक शिक्षणाअभावी दुःखात पिचत पडतात. त्यामुळे शिक्षणाअभावी समाजात विषमता पसरते व समाजाची प्रगती थांबते. त्यामुळे राजकिय, सामाजिक, सांस्कृतिक व आर्थिक क्षेत्रातील परिवर्तनासाठी शैक्षणिक क्षेत्रात परिवर्तन होणे गरजेचे आहे. त्याचबरोबर शिक्षणाचा हक्क सर्वांना मिळाला पाहिजे. हे लक्षात घेऊन, अनेक महात्मांनी शैक्षणिक क्षेत्रात महत्वपुर्ण कार्य केलेले आहे. त्यातून समाजातील सर्वांना शिक्षण मिळून समाज परिवर्तन होण्यास मदत झाली. अशा महात्मापैकी शिक्षणाची उपाधी, सत्तेची ऊब व परंपरेची कुबडी यापैकी कशाचाच मळवट कपाळी न भरता, केवेळ सेवेच्या, त्यागाच्या आणि कष्टाच्या बळावर महाराष्ट्राच्या दऱ्याखोऱ्यात राहणाऱ्या असंख्य लोकांना अज्ञानाच्या शृंखलेतून मुक्त करणारा एक थोर महात्मा म्हणजे कर्मवीर भाऊराव पाटील हे होते. या कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या विचार व कार्याचा आढावा या शोधनिबंधातून घेण्यात आलेला आहे.

कर्मवीर भाऊराव पाटील यांचा जन्म कोल्हापूर जिल्हयातील कुंभोज गावी एका धर्मश्रध्दाळु जैन कुंटूंबात 22 सप्टेंबर 1887 रोजी आला.[1] भाऊरावांचे बालपण कुंभोजलाच गेले. ते रामलिंगच्या डोंगरातील महादेव मंदीराच्या व बाहुबली येथील जैन धर्म संस्थापक महावीरांच्या परिसरात दिवसभर मित्राबरोबर फिरत असतं. या काळात ते नदीत पोहणे, सूरपारंब्या खेळ या सारखे खेळात मित्राबरोबर रमूनजात होते. भाऊरावांचे वडिल पायगौंडा पाटील महसुल खात्यात नोकरीस होते वडिलांची नोकरीत सतत बदली होत असल्याने भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण दहिवडी, विटा अशा वेगवेगळया गावी झाले. भाऊरावांनी इंग्रजी शिक्षण घ्यावे ही पायगौंडा पाटील यांची तीव्र इच्छा होती. त्यासाठी त्यांनी भाऊरावांना 1902 मध्ये कोल्हापूरच्या राजाराम हायस्कुलमध्ये पाठविले. तेथे त्यांची राहण्याची सोय राजश्री छ. शाहु महाराजांनी स्थापन केलेल्या जैन वसतिगृहात केली.[2] कर्मवीर भाऊराव राजाराम हायस्कुलमध्ये शिक्षण घेत होते, पण त्यांना शिक्षणामध्ये अजिबात रस नव्हता, त्यांचा ओढा सामाजिक कार्याकडे होता. त्याचा परिणाम असा की, इंग्रजी सहावी परिक्षेत त्यांना अपयश आले आणि तेथेच कर्मवीरांचे शालेय शिक्षण 1907 मध्येच थांबले. कोल्हापूर येथील वास्तव्यात त्यांच्यावर छत्रपती शाहु महाराजांचा सहवास व सत्यशोधक चळवळ याचा त्यांच्या वैचारिक जडणघडणीवर खोल परिणाम झाला. निर्भय व स्वतंत्रवृत्ती, अन्याय व असत्य यांची चीड, स्वाभीमान व सडेतोडपणा, दिनदुबळयाविषयी कणव व सार्वजनिक कार्याची आवड हा त्यांचा स्थायीभाव होता. महात्मा फुले व सत्यशोधक चळवळीच्या प्रभावामुळे

भाऊरावांनी जातिभेद व अस्पृश्यता यांच्याविरोधात बंड पुकारले. त्यांनी बहुजन समाजाचा खरा उध्दार सार्वत्रिक शिक्षणा प्रसाराखेरीज होणार नाही हे लक्षात घेतले. त्यामुळे ग्रामीण भागामध्ये शिक्षणाचा प्रसार हेच भाऊरावांनी आपल्या जीवनाचे ध्येय ठरविले. त्यातून त्यांनी शैक्षणिक कार्यास प्रारंभ केला. त्याकाळी मुलांना शिक्षणासाठी दूरगावी जावे लागे. मुलांची राहण्याची सोय व्हावी म्हणून कर्मवीर आण्णांनी 1910 साली दूधगांव शिक्षण प्रसारक मंडळ, स्थापन करून या संस्थमार्फत 'दूधगांव विद्यार्थी आश्रम' स्थापन केला.[3] या वसतिगृहात मराठा, महार, मांग, मुसलमान वगैरे सर्व जातीच्या विद्यार्थ्यांच्या राहण्याची व भोजनाची सोय केलेली होती. त्यानंतर कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन 1919 मध्ये काले येथे त्यांनी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.[4] त्यांनी कराड तालुक्यातील या काले व वाळवा तालुक्यातील नेर्ले या ठिकाणीही सर्वांसाठी वसतिगृह सुरू केले. सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांनी एकत्रित ठेवल्याने जातिभेद नष्ट होण्यास मदत होईल. या दृष्टीकोनातून त्यांनी सर्व जातीधर्माच्या विद्यार्थींना एकाच वसतिगृहात ठेवले.

आतापर्यंत भाऊरावांचे शिक्षणाप्रसार कार्य बुधगांव, नर्ले व काले इ. लहान गावात चालु होते. त्याला एका व्यापक चळवळीचे रूप देण्याची वेळ आली होती. त्यासाठी भाऊरावांनी सातारा येथे रयत शिक्षण संस्थेचे स्थलांतर केले व त्यांनी 1924 मध्ये सातारा येथे सर्व जातीधर्माच्या विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह स्थापन केले.[5] या वसितगृहात विविध जातींची व धर्माची मुले दाखल करून घेतली होती. सन 1927 साली राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या शुभहस्ते या वसतिगृहाचे 'छत्रपती शाहु बोर्डिंग हाऊस' असे नामकरण झाले. कर्मवीर आण्णांच्या कार्याने महात्मा गांधी अत्यंत प्रभावित झाले. 'मी साबरमती आश्रमात हा प्रयोग करून पाहिला, पण तेथे मला यश आले नाही. भाऊराव, तुम्ही हा प्रयोग यशस्वी करून दाखविला, तुम्ही येथे नवसमाजाची उभारणी करीत आहात, तुमच्या कार्यास माझा आशिर्वाद आहे. अशा शब्दांत महात्मा गांधींनी कर्मवीर आण्णांचा गौरव केला.[6] कर्मवीरांनी वसतिगृहातील मुलांना 'कमवा व शिका' श्रम करा व शिका हा मंत्र दिला. ग्रामीण जनतेच्या मुलांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणावयाचे असेल तर अगोदर त्यांच्या राहण्या–जेवणाची सोय केली पाहिजे. हे लक्षात घेऊन कर्मवीरांनी वसतिगृहापासून शैक्षणिक कार्याची सुरूवात केली. त्यांनी पालकांना चिंतामुक्त केल्यामुळे त्यांची मुल शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आली.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सन 1935 च्या सुमारास खेडोपाडी प्राथमिक शाळा सुरू करण्याचे ठरविले. ज्याठिकाणी शाळा चालु करणे अतिशय अवघड होते, अशा डोगर कपारीतील खेडयापाडयामध्ये भाऊरावांनी स्वयंसेवी प्राथमिक शाळा स्थापन केल्या. प्राथमिक शिक्षण चांगल्या प्रतिचे व्हायचे असेल तर त्या शाळेत प्रशिक्षित शिक्षक असला पाहिजे. त्यातून त्यांनी खेडे तेथे शाळा आणि शाळा तेथे प्रशिक्षित शिक्षक हे सुत्र मनाशी धरून 1935 मध्ये सातारा येथे अध्यापक विद्यालय स्थापन केले. प्राथमिक शिक्षकांच्या प्रशिक्षणाची सोय केली.[7]

प्राथमिक शिक्षणानंतर विद्यार्थ्यांच्या माध्यमिक शिक्षणाची सोय व्हावी म्हणून आण्णांनी 1940 मध्ये बडोदयाचे राजे महाराजा सयाजीराव गायकवाड यांच्या नावे सातारा येथे माध्यमिक विद्यालयाची स्थापना केली. या माध्यमिक शाळेतील शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी माध्यमिक शाळेत प्रशिक्षित पदवीधर शिक्षक असावेत व ते संस्थेच्या ध्येय धोरणानुसार काम करणारे असावेत या हेतूने कर्मवीरांनी 1955 साली सातारा येथे 'आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशन' ची स्थापना केली.[8] या महाविद्यालयात दर्जेदार शिक्षक तयार झाले.

माध्यमिक शिक्षण पुर्ण करणाऱ्या गोरगरिबांच्या मुलांच्या उच्चशिक्षणाची सोय व्हावी, तसेच 'कमवा व शिका' हा स्वावलंबनाचा प्रयोग ही कर्मवीरांना उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांवर करावायाचा होता. त्यासाठी कर्मवीरांनी सन 1947 मध्ये सातारा येथे छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावे महाविद्यालयाची स्थापना केली.[9] त्यानंतर कर्मवीरांनी विविध प्रकारची शिक्षण देणारी अनेक महाविद्यालय वेगवेगळया ठिकाणी स्थापन केली.

अशाप्रकारे प्राथमिक, माध्यमिक उच्च व व्यावसायिक शिक्षण संस्थेच्या स्थापनेतून रयत शिक्षण संस्थाचा मोठा विकास झाला. आज आणांनी स्थापन केलेली रयत शिक्षण संस्था ही अशिया खंडातील सर्वांत मोठी संस्था आहे. या संस्थेच्या महाराष्ट्रातील 14 जिल्हयात व कर्नाटक राज्यात मिळून 672 शाखा आहेत. त्यामध्ये 18 पुर्व प्राथमिक, 26 प्राथमिक, 439 माध्यमिक विद्यालय, 8 आश्रमशाळा, 8 अध्यापक विद्यालय, 2 आय.टी.आय. कॉलेज व 40 महाविद्यालयांचा त्यात समावेश आहे. या संस्थेत सुमारे 17 हजार सेवक काम करतात व 4 लाख 34 हजार विद्यार्थी शिक्षणाचा लाभ घेतात.[10] या संस्थेच्या माध्यमातून बहुजन समाजातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाची सोय झाली. त्यातून शिक्षणाची गंगा खेडयापाडयापर्यंत पोहचली गेली. त्यातून समाज परिवर्तन होण्यास मदत झाली. अशा प्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या शैक्षणिक कार्याद्वारे खेडयापाडयातून प्राथमिक, माध्यमिक शाळा सुरू केल्याने शिक्षण क्षेत्रातील मक्तेदारी संपुष्टात आली.

स्वतःच्या हिंमतीवर जबरदस्त विश्वास, श्रमावर श्रध्दा, अन्यायाची चीड, न्यायाची चाड आणि स्वावलंबी शिक्षणाविषयी नितांत प्रेम बाळगून सहयाद्रीच्या कुशीत लपलेल्या खेडया–पाडयातील शिक्षणाची मुळे खोलवर रूजविण्याचे दूरदर्शी शिक्षण कार्य करणाऱ्या कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शिक्षणाविषयीचे विचार अत्यंत मौलिक आहेत. त्यांनी शाळा, विद्यार्थी व शिक्षक या संदर्भात विचार व्यक्त करून शिक्षण क्षेत्रातील वास्तवता स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे. त्यातून शैक्षणिक विकासाला चालना मिळण्यास मदत झाली. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय व स्वातंत्र्य ही भाऊरावांच्या शैक्षणिक तत्वज्ञानाची चतुःसुत्री होती. याचा त्यांनी आपल्य शैक्षणिक विचारात अतंर्भाव केला होता. भाऊरावांच्या मते अडाणी जनतेला जर चांगले दिवस यायचे असतील तर एकच रामबाण उपाय व तो म्हणजे शिक्षण होय.[11] त्यांच्यामते शिक्षणाने बालकांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक असते. त्याकरिता त्यांनी वसतिगृहाच्या स्तरावर आश्रमीय पध्दतीचा वापर केला होता. बालकांनी स्वतःच्या उपजीविकेसाठी व प्रगतीसाठी शाळा शिकत जनावरांची

काळजी घेणे, शेती करणे, शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाण्याची सोय करणे, स्वतः स्वयंपाक करणे आणि इतर आश्रमीय कामे करणे यावर भर दिला होता. या दैनंदिन कामामुळे विद्यार्थ्यांत आत्मनिर्भरता, उद्योगप्रियता, समाजसेवा, दुसऱ्याच्या श्रमाचा फायदा न घेणे, या गुणांची मुलांमध्ये जोपासना होत असे. त्यामुळे 'कमवा व शिका' ही भावना मुलांमध्ये रूजून मोफत शिक्षणास चालना मिळत असे.[12] भाऊरावांच्या मते, जातपात, पंथभेद यांना वाव न देता शिक्षणाद्वारे प्रगतीची संधी सर्वांना मिळाली पाहिजे. तरचं शिक्षणाने पिळवणुक रहित समाज निर्माण होईल. त्यांच्यामते, शिक्षणाने शास्त्रीय दृष्टीकोण निर्माण करावा. त्यासाठी त्यांनी स्वावलंबी शिक्षण हेच आमच ब्रीद असे ध्येय ठरवून शासन दरबारी, शेतकऱ्याकडे आम्हांस ओसाड जमीन दया, आम्ही तिचे सुपीक जमीनीत कष्टाने परिवर्तन करू. असे जाहिरपणे सांगत असतं.[13] अशा रितीने लोकांना शिक्षणाभिमुख करून त्यांच्यात शास्त्रीय दृष्टीकोन निर्माण व्हावा असे त्यांना वाटे.

शिक्षणाबरोबरच शिक्षकाविषयी कर्मवीर आण्णा म्हणतात कि, शिक्षणाचा मंडप ज्या आधारावर उभा करावयाचा तो शिक्षक, सदविचारी व परिश्रमावर निष्ठा ठेवणारा पाहिजे. शिक्षक हा अत्यंत साधी राहणी, पण अत्यंत पवित्र, अव्याभिचारी, थोर विचारसरणी असलेला पाहिजे. त्यांच्यामते, माझा आदर्श शिक्षक हा त्या खेडयाचा आदर्श ग्रामसेवक व आदर्श ग्रामनायक असला पाहिजे.[14] भाऊरावांना खेडयापाडयात काम करू इच्छिणारा शिक्षक केवळ डिगाऱ्यांचे ओझे सांभाळणारा नको होता. कर्तव्यनिष्ठा असलेला, मन आणि मनगट मजबुत असलेला व बहुजन समाजाला ज्ञान देण्याच्या ध्येयाने प्रेरित झालेला शिक्षक त्यांना हवा होता. त्यांच्यामते, शाळा ही पोरं भरण्याची जागा नसून असंख्य मुलांना नवविचार देण्याची जागा आहे म्हणून तेथे शिक्षणाचे जलसिंचन करून ज्ञानवेलीच्या छायेत स्वावलंबनाचा पाठ शिकविणारा शिक्षक पाहिजे.

शिक्षकाप्रमाणे विद्यार्थ्यांविषयी कर्मवीर आण्णा म्हणतात की, प्रत्येक विद्यार्थी आचरणशील, विचारशील, बाणेदार वृत्तीचा, सत्याची चाड असलेला, अन्यायाची चीड असलेला, स्वाभिमानी, स्वावलंबी व विनयशील असला पाहिजे. त्यांच्यामते, केवळ पोपटपंची करणारे विद्यार्थी मला तयार करावयाचे नाहीत. त्यांच्याकरिता माझी संस्था नाही. अन्यायाला ठोकणारा एक जरी विद्यार्थी या संस्थेत राहिला तरी मी माझ्या जीवनाचे सार्थक झाले असे मानीन.[15] शिक्षण संस्थेतून बाहेर पडणारे विद्यार्थी सुसंस्कृत, चारित्र्यवान व जबाबदार नागरिक बनले पाहिजे. आपला विद्यार्थी नोकरीसाठी लोकनेत्याचे उंबर झिजवणारा बेभान व बेकार तरूण नसावा. हा कर्मवीरांचा अट्टाहास होता.[16] अशाप्रकारे त्यांचे शाळा, शिक्षक व विद्यार्थी यांच्याबाबत विचार होते. त्याच विचारांवर आज रयत शिक्षण संस्था वाटचाल करीत असून त्यांच्या संस्थेतील शिक्षक व विद्यार्थ्यांची त्यांच्या विचारावरच जडणघडण झाल्याचे दिसून येते.

अशाप्रकारे कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपल्या विचाराप्रमाणे शैक्षणिक कार्य करून बहुजन समाजाला शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली. थोर विभूती काळाची गरज म्हणून जन्माला येतात व अलौकिक कार्य करून जातात. समाजातील अज्ञान व दारिद्रय समुळ नष्ट करण्यासाठी शिक्षणासारखे पवित्र आणि प्रबल साधन हाती घेऊन भाऊरावांनी उभा महाराष्ट्र जागा केला. त्यांनी शिक्षणाची गंगा महाराष्ट्राच्या खेडयापाडयातल गरीब शेतकऱ्यांच्या व पददलितांच्या झोपडीपर्यंत नेऊन पोहचविली व अज्ञान अंधःकारात खितपत पडलेल्या गोरगरीब समाजाचा उध्दार घडवून आणला. महाराष्ट्रातील बहुजन समाजाला उच्च वर्गाच्या सामाजिक गुलामगिरीतून मुक्त करण्याची तळमळ त्यांना लागून राहिली होती. हि गोष्ट बहुजन समाजात शिक्षणाचा प्रसार घडवून आणण्याने साध्य होऊ शकेल. याची जाणीव त्यांना झाली होती. त्यामुळे त्यांनी स्वतःला शैक्षणिक कार्याला गुंतवून घेतले व बहुजन समाजाच्या उन्नतीचा मार्ग मोकळा करून दिला. अशाप्रकारे बहुजन समाजात शिक्षणाचे कार्य करीत असताना 9 मे 1959 मध्ये या महान शिक्षण प्रणेत्याची प्राणज्योत मालवली.

संदर्भ साधने

1)प्रा. पाटील व्ही.पी, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, मेहता पब्लिकेसिंग हाऊस, पुणे, दुसरी आवृत्ती जाने 1993 पृ. 151.
2)प्राचार्य भगत रा.तु., महात्मा जोतीराव ने कर्मवीर भाऊराव, युनिव्हर्सल पब्लिकेशन्स, कोल्हापूर, प्रथमावृत्ती 15 ऑगस्ट 1973, पृ. 204.
3)प्रा. साखळकर एकनाथ व डॉ. सुभाष भेण्ड, महाराष्ट्राची मानचिन्हे, मॅजेस्टिक प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती 1 मे 1996, पृ. 155.
4)कित्ता पृ. 156.
5) उपरोक्त, महाराष्ट्रातील समाज सुधारणेचा इतिहास, पृ. 155.
6)मा. शिंदे आर.के. व इतर, एक महान कर्मयोगी, कर्मवीर भाऊराव पाटील, सातारा प्रथमावृती 22 सप्टेंबर 2006, पृ. 06.
7)कित्ता, पृ. 08.
8)उपरोक्त महाराष्ट्राची मानचिन्हे पृ. 159.
9)उपरोक्त एक महान कर्मयोगी कर्मवीर भाऊराव पाटील, पृ. 09.
10)कित्ता, पृ. 01.
11)प्राचार्य भगत रा.तु., शिक्षणातील थोर विचारवंत, चैतन्य प्रकाशन, कोल्हापूर, द्वितीय वृत्ती 17 जुन 2005, पृ. 183.
12)डॉ. घोरमोडे यू.के., शैक्षणिक विचारवंत, विद्या प्रकाशन नागपूर, प्रथमावृत्ती जाने. 2006, पृ. 60.
13)कित्ता पृ. 61.

14)बॅलिस्टर पी.जी. पाटील, कर्मवीरोपनिषद सातारा, 1965, पृ. 71.
15)उपरोक्त, शिक्षणातील थोर विचारवंत, पृ. 183.
16)प्राचार्य भोसले शिवाजीराव प्रेरणा, अक्षरब्रम्ह प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती मार्च 2005, पृ. 132.